# संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९**

**घटक-कोल्हापूर**

**जाहिरात क्रमांक-१** **ठिकाण -कोल्हापूर** **दिनांक /८/२०१९**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.१.२०१९ व दिनांक ४.७.२०१९ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये जिल्हा पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी **७८** पदे भरण्यासाठी जिल्हा पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **जिल्हा पोलीस शिपाई :**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | ३ | ३३ | ० | १२ | ० | ० | १५ | १५ | ० | ० | ० | ७८ |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | ८ | ० | २ | ० | ० | ५ | ५ | ० | ० | ० | २२ |
| महिला | १ | १० | ० | ४ | ० | ० | ४ | ४ | ० | ० | ० | २३ |
| खेळाडु | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ०५ |
| प्रकल्पग्रस्त | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ०५ |
| भुकंपग्रस्त | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| माजी सैनिक | ० | ५ | ० | २ | ० | ० | २ | २ | ० | ० | ० | ११ |
| अंशकालीन पदवीधर | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ०५ |
| पोलीस पाल्य | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| गृहरक्षक दल | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ०५ |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ३ | ३३ | ० | १२ | ० | ० | १५ | १५ | ० | ० | ० | ७८ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील **०३** रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध आहेत .

३) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) व व www.kolhapurpolice.gov.inवर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्त्वाची टीप:-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो, **कोल्हापूर** यांना दुरध्वनी क्रमांक ०२३१-२५४०९८९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक कोल्हापूर या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उपअधीक्षक, पोलीस मुख्यालय,कोल्हापूर यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दूरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| २. | पोलीस अधीक्षक कार्यालय कोल्हापूर<br>कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२३१-२६५३९६० |

(डॉ.अभिनव देशमुख)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर